**विषय** - ओळखपत्र,कार्यालयीन कामकाजाच्या
सुचनाची अंमलबजावणी करणेबाबत.

सातारा जिल्हा परिषद ,सातारा
जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि/६३३/२०२५
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक - मार्च, २०२५

**वाचा** :-१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम.
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक- ८ डिसेंबर २०२०.
३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७/र.व.का-१ दि.१३.०१.२०२५.
४. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था-२(३)/११६०/२०२० दि.२९.१२.२०२०.
५. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था-२(३)/७९५/२०२२ दि.१८.०२.२०२२.
६. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था-२(३)/४४१/२०२० दि.०९.०२.२०२३.
७. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था-२(३)/६९७/४५१/२०२४ दि.०२.०२.२०२४.
८. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.परिषद-२/परिपत्रक/कावि- /२०२५ दि.२९.०१.२०२५.

---

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये कळविणेत येते की, **क्षेत्रिय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृति आराखडा** या विषयांवर मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र शासन यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी,महानगरपालिका आयुक्त,पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दृकश्राव्य परिषदेव्दारे संबोधित केले आहे.

कार्यालयीन शिस्तीचे अनुषंगाने सर्व वर्ग-१, वर्ग-२ , वर्ग- ३ व वर्ग -४ अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ओळखपत्राचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत सातारा जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व संबंधित खातेप्रमुख यांना संदर्भिय परिपत्रकान्वये अलाहिदा सुचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अनेक अधिकारी/कर्मचारी ओळखपत्राचा वापर करीत नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाडे जिल्हा परिषद अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी ओळखपत्र वापरत नसलेबाबत वारंवार या कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत.सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक प्रशासन अधिकारी,कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे कार्यालयात सनियंत्रण नसलेचे निदर्शनास येत आहे. सबब या परिपत्रकाच्या अनुषगांने सर्व सनियंत्रण पर्यवेक्षिय अधिकारी यांना सक्त सुचना देण्यात येत आहे.

सबब सर्व खातेप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ अधिकारी/कर्मचारी यांना सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे, ओळखपत्र लावणे तसेच वर्ग-४ कर्मचा-यांनी गणवेषात उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त सुचनांचे काटेकोर अंमलबजावणी करणेची

आहे. एखादा अधिकारी/कर्मचारी ओळखपत्र न लावता कार्यालयात प्रवेश केल्याचे निदर्शनास आलेस संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल,याची नोंद घ्यावी.

जिल्हा परिषद सातारा कडील सर्व खाते प्रमुख व त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.७१/ १८ (र.व.का.) दिनांक ८ डिसेंबर २०२० अन्वये महाराष्ट्र शासन अधिनस्त सर्व प्रकारची शासकीय कार्यालये येथून राज्य शासनाचा कार्यभार चालविला जातो. ही कार्यालये जनमानसातील प्रतिनिधी म्हणून पाहण्यात येतात. या कार्यालयांमध्ये मा.खासदार/ मा.आमदार/नगरसेवक इत्यादी लोकप्रतिनिधी, सर्व सामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे प्रतिनिधी व उच्च पदस्थ अधिकारी हे कामासाठी भेट देतात व भेट देणा-या संबंधिताशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून सुसंवाद साधतात. अशा वेळी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे अधिकारी/कर्मचारी यांची वेशभूषा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणून पाहिला जात असल्याने त्यांचे वेशभूषेवरुनच ते कार्यरत असलेल्या आस्थापनेची एक विशिष्ट छाप भेट देणा-या अभ्यांगतांवर पडते. त्यामुळे कार्यालयात काम करीत असलेल्या अधिकारी कर्मचारी यांनी आपली वेशभूषा ही शासकीय कार्यालयास किमान अनुरुप ठरेल अशी असावी याबाबत मार्गदर्शन सुचना देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने सातारा जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व कार्यालयामध्ये मा.खासदार/ मा.आमदार/ मा.जि.प. सदस्य/सरपंच इत्यादी लोकप्रतिनिधी, सर्व सामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे प्रतिनिधी व उच्च पदस्थ अधिकारी हे कामासाठी भेट देत असतात व संबंधिताशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषदेकडील अधिकारी/कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधतात.अशा वेळी अधिकारी/कर्मचारी यांचे वेशभूषेवरुनच भेट देणा-या अभ्यांगतांवर छाप पडते. उपरोक्त शासन परिपत्रकानुसार सातारा जिल्हा परिषदेकडील व जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कार्यालयाकडील अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देत आहे.

१. सर्व शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ असणार आहे. त्यामुळे वर्ग -४ संवर्गातील कर्मचा-यांसाठी कार्यालयीन वेळ ही सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील व सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ९.४५ पुर्वी उपस्थित राहून प्रत्यक्ष कामकाजास ९.४५ वाजता सुरुवात करणे आवश्यक आहे. तसेच सर्व कार्यालयांसाठी भोजनाची वेळ दु.१.३० ते २.०० अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

२. सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या हजेरीसाठी बायोमेट्रीक प्रणाली हजेरी नोंदविणे,बायोमेट्रीक प्रणालीवरील उपस्थिती खात्री करुनच वेतन देयके अदा करण्यात यावे.

३. शासकीय अधिकारी व कर्मचारी कामाच्या वेळेत कार्यालयीन कामासाठी बाहेर गेले असल्यास हलचाल नोंदवहीला नोंद असणे बंधनकारक आहे.

४. वर्ग - ४ कर्मचारी यांनी त्यांचे गणवेषात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे आवश्यक राहील.

५. सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी ओळखपत्र दर्शनी भागावर धारण करणे आवश्यक आहे.

६. कार्यालयीन वेळेत नेमुन दिलेल्या कार्यासनावर उपस्थित राहुन कार्यालयीन कामकाज करणे.

७. सातारा जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख तसेच क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी यांनी उपरोक्त नमूद अभ्यागतांच्या भेटीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहून कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या तक्रारींच्या/कामांचे अनुषंगाने समाधान करण्याचे आहे. दौरे, भेटी यामुळे जर अधिकाऱ्यास कार्यालयात उपस्थित रहाणे शक्य नसेल तर अशा प्रसंगी जनतेच्या भेटीसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी तसेच कार्यालयात भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी नोंदवही ठेवावे.

उपरोक्त दिलेल्या सुचनांचे जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कार्यालयातील नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी/कर्मचारी/सल्लागार यांनी काटेकोर अंमलबजावणी करण्याची आहे. सदर बाबत हलगर्जीपणा अगर गैरवर्तन झाल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

Signed by
Yashni Nagarajan
Date: 21-03-2025 20:14:55

याशनी नागराजन भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रति,

१. खातेप्रमुख (सर्व) --------------- जिल्हा परिषद सातारा
२. गटविकास अधिकारी (सर्व) पंचायत समिती---------------

प्रत:- सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता.